

# संतभूमी संरक्षक संघर्ष समिती-महाराष्ट्र राज्य.



संस्थापक-अध्यक्ष-श्री हरिभक्त मधुसूदन महाराज, भामचंद्र डोंगर, पो.वासुली, ता.खेड (राजगुरुनगर), जि.पुणे संपर्क – ७०८३७०५१७८/९४२०२२४३४१

प्रति, **वृत्तपत्रातून प्रकाशित करण्यासाठी पत्र** श्रीक्षेत्र भामचंद्र डोंगर

माननीय संपादक,

यांस वारकरी संप्रदाय 'संतभूमी संरक्षक संघर्ष समिती'चा सप्रेम जय हरि !

***संदर्भ-विषय :*** ***श्री क्षेत्र देहू-आळंदी पंचक्रोशी परिसर वारकरी संप्रदायाचे पावन तीर्थक्षेत्र आहे. त्या अंतर्गत "तुकोबांची तपोभूमी भंडारा-भामचंद्र डोंगर ही ध्यानकेंद्रे" अबाधित ठेवण्यासाठी "संतभूमी संरक्षक संघर्ष समिती" द्वारा चालू असलेल्या राज्यव्यापी आंदोलन-अभियाना बाबत.....***

महोदय,

सन २००७ मध्ये श्री क्षेत्र देहू-आळंदी जवळील संत तुकाराम महाराजांच्या ध्यानभूमी भामचंद्र डोगरास व चिंतनभूमी भंडारा डोगरास बिल्डर व व्यावसायीकांनी खाणी लावून या पावन भूमीची प्रतारणा केली व त्याच वेळी 'डाऊ' ही विषारी वायू व रसायने ओकणारी कंपनी सरकारने या संतभूमीत आणली. त्याविरोधात "संतभूमी संरक्षक संघर्ष समितीने" संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र आंदोलन छेडल्यानंतर 'डाऊ' चा परवाना अखेर रद्द केला. पण त्याचा रोष मनात बाळगून की काय... सरकारने तेथील बिल्डर लॉबीला हाताशी धरुन त्यांचेशी आतून कांही व्यवहार करुन एम.आय.डी.सी.च्या नावाखाली **'भंडारा-भामचंद्र डोंगर ही संतपीठे' उध्वस्त करण्याचा घाट घातला आहे. त्यासाठी सांस्कृतिक कार्य व पुरातत्त्व विभागाद्वारे सन २०११ मध्ये डोंगर संरक्षणासाठी काढलेल्या मुळ अधिसूचना सुधारित प्रस्तावाच्या नावाखाली सन २०१२ मध्ये बिल्डर लॉबीच्या दबावामुळे बदलण्याचा प्रयत्न चालला आहे. भारतीय प्राचीन स्मारके आणि पुरातत्त्वीय स्थळे अवशेष अधिनियमाची घटना जणू शासनानेच पायदळी तुडविली आहे. शासनाची ही करणी निषेधार्ह आहे.**

सरकारला या वाईट कृत्यापासून परावृत्त करण्यासाठी 'संतभूमी संरक्षक संघर्ष समिती' ने सन २००७ पासूनच या विरोधात रणशिंग फुंकले आहे. सनदशिरमार्गाने, वारकरी तत्त्वानुसार सहिष्णुभूमिका घेवून हे आंदोलन तीन स्तरावर चालूच राहील. **या रणनिती अंतर्गत (१) पहिल्या फेरीत** (स्तरावर) अखिल वारकरी संप्रदाय भाविकांद्वारा सरकारला जाग आणून कर्तव्याची जाणिव करुन देण्यासाठी मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन पत्रे पाठवून त्याची प्रत संबंधित विभागाला देणेत येईल. **(२) दुसऱ्या फेरीत** (स्तरावर) आंदोलनाची तीव्रता वाढवून धरणे आंदोलन, रास्ता रोको, निषेध पत्रके काढून सरकारला 'डोंगर संरक्षणा'ची गांभीयनि जाणिव करुन देण्यात येईल. **(३) तिसऱ्या फेरीत पूर्वीच्या दोन्हीं स्तरासह एकाचवेळी सर्वत्र तीव्र प्राणांतिक उपोषण व दिंड्या-पताका रस्त्यावर उतरुन जेलभरो मोहिमेद्वारे आंदोलनाची उग्रता वाढवून सरकारला ज्ञानोबा-तुकोबांच्या संतभूमीपुढे झुकविण्यास भाग पाडू ! जसे आम्ही- "*माय बापाहूनि बहु मायावंत ।*" आहोत तसे- "*करु घातपात शत्रुहूनि ।।*" असेही आहोत हे 'डाऊ' आंदोलन प्रसंगी सरकारने अनुभवले तसेच अखेर घडेल...!**

यास्तव आमची मुख्यभूमिका सरकारने जपावी. आजपर्यंत संत साहित्यातून वारकरी संप्रदायाने सहिष्णूतेचा-समतेचा-बंधुत्वाचा, देश व समाजाविषयी प्रेम आणि ऐक्याचाच संदेश दिलेला आहे. तरीदेखील संत वाङ्मय(अभंग गाथा) निर्मितीच्या या संतपीठांचे (भंडारा-भामचंद्र डोगरांचे) संरक्षण, जतन सरकार करणार नसेल तर.... **वारकऱ्यांना संघर्षाच्या भूमिकेत उतरवून जणू सरकारच समाजातील एकूण-एक घटकाला संघर्षाच्या खाईत लोटण्याचे महापाप करीत आहे.**

म्हणून या आंदोलनात सरकारकडे वारकरी संप्रदायाच्या प्रमुख मागण्या राहतील की -

* ऑक्टोंबर-नोव्हेंबर सन २०११ च्या शासन निर्णयानुसार हे डोंगर **"संत तुकोबांचे राज्य संरक्षित स्मारक"** म्हणून काढलेल्या मुळ प्राथमिक अधिसूचना तुकोबांच्या भंडारा-भामचंद्र डोंगराला न्याय देणाऱ्या असून त्यावर घेतलेल्या विरोधकांच्या हरकती फेटाळून लावून त्या मुळ अधिसूचना अंतिम म्हणून घोषित कराव्यात व **त्यांची अंमलबजावणी लवकरात लवकर "*भले तरि देऊ गांडिची लंगोटी । नाठ्याळाचे माथा देऊ काठी ।।*" या चौथ्या व अंतिम स्तरावर आंदोलन पोहचण्या अगोदर व्हावी.**

* शांतीचा संदेश देणारी ही संतपीठे सरकारने सभोवताली भक्कम तटबंदी करुन जतन करावीत व "***वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ।।***" असा हा पर्यावरणाचा समतोल राखणारी शासनाची **"संत तुकाराम वन योजना"** महाराजांच्या याच तपोभूमीत प्रथमत: राबवावी व '***बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले ।।***' हे तुकोबांचे अभंग वचन शासनाने आचरणात आणावे.

अशाप्रकारे आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून आपला जिल्हा, तालुका, गावातील, संतभूमीवर प्रेम करणाऱ्या वारकऱ्यांच्या, भाविकांच्या, चिंतकांच्या संतभूमीप्रती वरील व त्याप्रमाणे असणाऱ्या भावना संपूर्ण महाराष्ट्रभर प्रकाशित करुन पोहचवाव्यात व **संतभूमीच्या विजयाचे लक्ष गाठण्यास मोलाचा हातभार लावावा**, ही आदरणीय संपादकास नम्र विनंती. आपले विश्वासू,

**संतसेवक प्रवक्ते श्री. गजानन महाराज पिंपळे**
कार्याध्यक्ष मो. ९८५०४२९८०९

**हरिभक्त श्री. मधुसूदन महाराज पाटील**
संस्थापक-अध्यक्ष

*** श्री. ह.भ.प. संचालक *-संतभूमी संरक्षक संघर्ष समिती-***

*पत्रव्यवहाराचा पत्ता*

*विभागीय कार्यालय :-*
**संतभूमी संरक्षक संघर्ष समिती,**
सूर्यभानजी पिंपळे स्मृतीभवन, अलंकापुरीनगर,
आळंदी-देव, ता. खेड, जि. पुणे-४१२ १०५